दैनिक
अतुल्य महाराष्ट्र

आपल्याकडे काही न्युज सबंधित महत्वाचे व्हीडिओ असतील तर खालील नंबर पाठवा. मो. 8421577797 आपले नाव गुपीत ठेवण्यात येईल

मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ बीड महाराष्ट्र | शनिवार, 31 ऑक्टोबर 2026 | अंक क्र. 167 | वर्षे 4 थे | मुल्य 3 रूपये | पृष्ठे 4

Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com

अंबाजोगाईत अतिक्रमण हटाव मोहीम वेगात; उद्या चार प्रमुख मार्गांवर धडक कारवाई!

उद्या (31 ऑक्टोबर) सकाळी 9 वाजल्यापासून पुन्हा कारवाई; पुढील काही दिवस अतिक्रमण हटाव मोहीम सुरुच राहणार अतिक्रमणधारकांना प्रशासनाचा थेट इशारा; स्वत:हून अतिक्रमणे हटवा, अन्यथा नुकसानीला सामोरे जा!

■ अंबाजोगाई प्रतिनिधी :

अंबाजोगाई शहरातील अतिक्रमण हटाव मोहिमेला आज शुक्रवार, दि. ३० ऑक्टोबर रोजी सकाळपासून सुरुवात झाली असून, उद्या शनिवार, दि. ३१ ऑक्टोबर रोजी सकाळी ९ वाजल्यापासून पुन्हा धडक कारवाई करण्यात येणार आहे. शहरातील प्रमुख रस्ते, चौक, बाजारपेठा आणि सार्वजनिक जागा अतिक्रमणमुक्त करण्यासाठी प्रशासनाने मोहीम हाती घेतली आहे. ही मोहीम पुढील काही दिवस सुरू राहणार आहे अशी माहिती प्रशासनाच्या वतीने देण्यात आली आहे.

उद्या या प्रमुख मार्गांवर कारवाई

शनिवार, दि. ३१ ऑक्टोबर रोजी छत्रपती शिवाजी महाराज चौक ते संत भगवानबाबा चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक ते यशवंतराव चव्हाण चौक, स्वाराती रुग्णालय परिसर तसेच लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौक ते मांडवा रोड या मार्गांवरील अतिक्रमणे हटविण्यात येणार आहेत.अनधिकृत बांधकाम, रस्त्यावरील डबे, अनधिकृत शेड, पत्रे, हातगाड्या आणि नाल्यांवरील अतिक्रमणांवर कारवाई केली जाणार आहे.

विविध विभागांचा सहभाग; तगडा पोलीस बंदोबस्त

या मोहिमेत सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबाजोगाई नगर परिषद, महसूल प्रशासन आणि महावितरणचे अधिकारी व कर्मचारी सहभागी होत आहेत. कारवाईदरम्यान कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी तगडा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

अतिक्रमणधारकांना थेट इशारा!

संबंधित व्यापारी, हातगाडीधारक आणि अतिक्रमणधारकांनी स्वतःहून अतिक्रमणे काढून घ्यावीत. अन्यथा प्रशासनाकडून थेट कारवाई करण्यात येईल. कारवाईदरम्यान होणाऱ्या नुकसानीला संबंधितांनी सामोरे जावे, असा स्पष्ट इशारा प्रशासनाच्या वतीने देण्यात आला आहे. आजपासून सुरू झालेली ही मोहीम पुढील काही दिवस सुरू राहणार असून, अंबाजोगाईतील रस्ते, नाले आणि सार्वजनिक जागा अतिक्रमणमुक्त करण्यासाठी नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

शेतकरी कापूस प्रक्रिया सहकारी संस्थेच्या कापूस व सोयाबीन खरेदीचा शुभारंभ उत्साहात संपन्न

■ परळी वैजनाथ (प्रतिनिधी)

शेतकरी कापूस प्रक्रिया सहकारी संस्था मर्यादित, परळी वैजनाथ अंतर्गत जिनिंग व प्रेसिंग फॅक्टरी, टोकवाडी येथे सन 2026-27 च्या कापूस खरेदी व सोयाबीन खरेदीचा शुभारंभ सोमवारी (दि. 26 ऑक्टोबर) उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाला सहकार क्षेत्रातील पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, शेतकरी आणि मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान जि.प.बीडचे गटनेते अजय मुंडे यांनी भूषविले, तर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सुर्यभान (नाना) मुंडे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून राजर्षी शाहू पतसंस्था सिरसाळाचे अध्यक्ष वसंतराव निर्मळ, महाराष्ट्र बँकेचे मुख्य प्रबंधक महेशजी गौतम, कान्हेगावचे पोलीस पाटील चंद्रकांतराव मोकाशे, वैद्यनाथ बँकेचे संचालक डॉ. राजाराम मुंडे, कावळेवाडीचे सरपंच प्रकाशराव कावळे, बेलंबाचे सरपंच किशोर गित्ते, माजी सरपंच रामधन राठोड, गाढे पिंपळगावचे माजी सरपंच शरदराव राडकर यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांचे स्वागत संस्थेचे अध्यक्ष ॲड. अमोल सोळंके, उपाध्यक्ष ॲड. नागोराव देशमुख व सर्व संचालकांनी केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष व महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघाचे संचालक ॲड. विष्णुपंत सोळंके यांनी केली. त्यांनी संस्थेच्या कार्याची माहिती देत कापूस व सोयाबीन खरेदी हंगामाच्या प्रारंभाचे महत्त्व विशद केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुरज शिंदे यांनी केले. अध्यक्षीय समारोपानंतर इंजिनीयर सत्यजित सोळंके यांनी उपस्थित मान्यवर, शेतकरी व सहकार्य करणाऱ्या सर्वांचे आभार मानले.

टोकवाडी-संगम रोड, टोकवाडी येथे असलेल्या संस्थेच्या जिनिंग व प्रेसिंग फॅक्टरीत कापूस व सोयाबीन खरेदी हंगाम सुरू झाल्याने परिसरातील शेतकऱ्यांना आपला शेतमाल विक्रीसाठी सुविधा उपलब्ध झाली आहे. या शुभारंभाच्या निमित्ताने संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी सर्व शेतकरी बांधवांना खरेदी प्रक्रियेत सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

पोहनेरमध्ये माती उत्खनन!

उत्खनन, रॉयल्टी आणि परवानग्यांची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी

■ सिरसाळा | प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील परळी तालुक्यातील मौजे पोहनेर येथे दर्गाह हबीबा बानो संस्थानच्या जमिनीवरील कथित माती व गौण खनिज उत्खननाचा मुद्दा आता ऐरणीवर आला आहे. गट क्रमांक १ मधील जमिनीतून हजारो ब्रास मातीचे उत्खनन करून तिची विल्हेवाट लावण्यात आल्याचा गंभीर आरोप तक्रारदाराने केला आहे. या प्रकरणी वारंवार तक्रारी करूनही ठोस कारवाई झाल्याचे दिसत नसल्याचा दावा करण्यात येत असल्याने महसूल प्रशासनाच्या कार्यपद्धतीवरच प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. जमिनीवर अवैध माती उत्खनन झाले असेल, तर त्याची अधिकृत मोजणी कोण करणार? परवानग्या आणि रॉयल्टीच्या नोंदी तपासल्या का? आणि तक्रारीनंतरही कारवाई झाली नसेल, तर त्याला जबाबदार कोण? असे सवाल आता उपस्थित होत आहेत. शिरसाळा येथील रहिवासी शेख इब्राहिम नुसरत यांनी या प्रकरणी जिल्हाधिकारी बीड, पोलीस अधीक्षक बीड, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार परळी वैजनाथ, जिल्हा खनिकर्म अधिकारी आणि संबंधित विभागांकडे तक्रार दाखल केली आहे. १४ ऑक्टोबर २०२६ रोजी दिलेल्या निवेदनातून संबंधित जमिनीवरील कथित उत्खननाची सखोल चौकशी करून शासनाच्या महसुलाचे नुकसान झाले आहे का, याची पडताळणी करण्याची मागणी करण्यात आली आहे. मात्र, या प्रकरणात प्रत्यक्ष उत्खननाचे मोजमाप, मातीची वाहतूक, विक्री, उत्खनन परवानग्या आणि रॉयल्टीच्या नोंदी तपासल्या गेल्यास वस्तुस्थिती स्पष्ट होऊ शकते. त्यामुळे केवळ कागदोपत्री चौकशी न करता प्रत्यक्ष स्थळपाहणी करण्याची मागणी करण्यात आली आहे. तक्रारदाराच्या म्हणण्यानुसार, संबंधित संस्थानच्या जमिनीवर मोठ्या प्रमाणात उत्खनन झाल्याचे दिसत असून, याबाबत तहसीलदार, मंडळ अधिकारी आणि तलाठी स्तरावर प्रभावी कारवाई झालेली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे.

उत्खननासाठी सक्षम प्राधिकरणाची परवानगी घेण्यात आली होती का? प्रत्यक्षात किती ब्रास माती काढण्यात आली? वाहतुकीसाठी आवश्यक कागदपत्रे होती का? शासनाची रॉयल्टी भरली होती का? नियमांचे उल्लंघन झाले असल्यास किती महसुली नुकसान झाले? या प्रश्नांची उत्तरे संबंधित विभागांच्या नोंदी आणि प्रत्यक्ष पंचनाम्यातूनच समोर येऊ शकतात.

■ तक्रारदाराचा खळबळजनक आरोप!

या प्रकरणात संबंधितांना प्रशासनाकडून अभय दिले जात असल्याचा आणि कथित व्यवहारातून प्रशासनाला दररोज हप्ता मिळत असल्याचा गंभीर आरोप तक्रारदाराने केला आहे. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांची भूमिका, उपलब्ध पुरावे आणि आर्थिक व्यवहारांची पडताळणी करूनच सत्य समोर येणे आवश्यक आहे. जर या आरोपांत तथ्य नसेल, तर प्रशासनाने चौकशीतून ते स्पष्ट करावे; आणि नियमबाह्य उत्खनन किंवा गैरव्यवहार आढळल्यास संबंधितांवर कायद्यानुसार कारवाई करावी. आरोप गंभीर आहेत; मग त्यांची निष्पक्ष चौकशी होणार की हे प्रकरणही कागदोपत्रीच राहणार? हा मुख्य प्रश्न आहे.

■ जिल्हाधिकारी यांनी लक्ष घालावे; जनतेची मागणी

जिल्हाधिकारी यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन संबंधित जमिनीची प्रत्यक्ष पाहणी करावी अशी मागणी शेख इब्राहिम नुसरत यांनी केली आहे. उत्खननाचे अधिकृत मोजमाप, पंचनामा, परवानग्या, रॉयल्टी, वाहतूक नोंदी आणि शासनाच्या संभाव्य महसुली नुकसानीची तपासणी करावी. तसेच संबंधित अधिकाऱ्यांनी यापूर्वी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल मागवून निष्काळजीपणा किंवा नियमभंग आढळल्यास कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

■ आता वक्फ बोर्डाची भूमिका निर्णायक ठरणार?

दर्गाह हबीबा बानो संस्थानच्या जमिनीवरील कथित उत्खनन प्रकरणी वक्फ बोर्डाकडेही तक्रार करण्यात आल्याचे तक्रारदाराने नमूद केले आहे. त्यामुळे आता या प्रकरणाकडे केवळ महसूल विभागाच्याच नव्हे, तर संबंधित संस्थानच्या मालमत्तेच्या संरक्षणाच्या दृष्टीनेही पाहिले जात आहे. पोहनेर येथील कथित उत्खनन प्रकरणात आता जिल्हाधिकारी कार्यालय, महसूल विभाग, खनिकर्म विभाग आणि वक्फ बोर्ड यांची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे. तक्रारीची दखल घेऊन प्रत्यक्ष चौकशी केली जाणार का, कथित उत्खननाचे प्रमाण निश्चित होणार का आणि नियमभंग आढळल्यास जबाबदारी निश्चित केली जाणार का, याकडे परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

मुंबई महापालिकेच्या वीज वापराचे होणार मूल्यांकन; महापालिकेच्या वतीने होणार तांत्रिक समितीचे लवकरच गठन

■ मुंबई : प्रतिनिधी

मुंबई महानगरपालिकेच्या विविध विभागांमधील विद्युत वापराच्या पद्धतींचे आता सर्वकष मूल्यांकन करण्यात येणार असून यासाठी विजेच्या वापराचा आढावा घेण्यासाठी तांत्रिक समितीची नियुक्ती करण्यात येणार आहे. यामध्ये टाटा पॉवर, महापारेषण आणि महापालिका विद्युत व यांत्रिक विभागाचे निवृत्त अधिकाऱ्यांचा समावेश या समितीमध्ये असेल. ही समिती दोन महिन्यांमध्ये आपला अहवाल महापालिकेला सादर करणार असून यामध्ये विजेचा वापरासंदर्भात काही शिफारशी तसेच महापालिकेच्यावतीने निर्मित केल्या ऊर्जा प्रकल्पांबाबतच्या शिफारशी अपेक्षित आहेत.

मुंबई महापालिकेच्या मुख्यालयासह विविध २६ प्रशासकीय कार्यालये तसेच इतर कार्यालयांमध्ये विजेचा वापर आणि ऊर्जा बचत आदींबाबत आढावा घेवून सर्वंकष अहवाल बनवण्यासाठी तांत्रिक समितीची निवड करण्याचा निर्णय यांत्रिक व विद्युत विभागाने घेतला आहे. त्यामध्ये तज्ज्ञ निवृत्त अधिकाऱ्यांचा समावेश असेल. अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, सध्याच्या वीज वापराच्या पद्धती, ऊर्जा बचतीची क्षमता तसेच महानगरपालिकेच्या मालकीच्या कॅप्टिव्ह वीज निर्मिती प्रकल्पांच्या कार्यक्षेत्राचा सर्वंकष निदानात्मक अहवाल या समितीकडून अपेक्षित आहे.

या समितीकडून विश्लेषणाचे काम व अहवाल हे विशेष स्वरूपाचे काम केले जाईल. तसेच आवश्यक तांत्रिक कौशल्याचे आणि वेळबद्ध स्वरूपाचे असल्याने या क्षेत्रातील तज्ज्ञांचा समावेश या तांत्रिक समितीमध्ये करण्यात आला आहे.

भारत वि. न्यूझीलंड चौथ्या टी-20 मॅचला सुरूवात, भुवनेश्वर कुमार आणि वैभव सूर्यवंशी बाहेर

मुंबई : वृत्तसंस्था

भारत आणि न्यूझीलंडमधील चौथ्या टी-२० सामन्याला सुरूवात झाली आहे. आजच्या सामन्यातही कॅप्टन श्रेयस अय्यर याने टॉस जिंकत पहिल्यांदा गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतलाय. मालिकेत विजयी आघाडी घेतल्यानंतर भारतीय संघ आता न्यूझीलंडविरूद्ध आजच्या सामन्यात दोन बदल पाहायला मिळाले आहेत. वैभव सर्यवंशी आणि भुवनेश्वर कुमार यांना संघाबाहेर केले आहे. त्यामुळे प्लेइंग ११ मध्ये कोणाची एन्ट्री झाली जाणून घ्या. आठ फलंदाज खेळवण्याची रणनीती आतापर्यंत यशस्वी ठरली आहे आणि त्याच जोरावर भारतानेपहिले तिन्ही सामने जिंकले आहेत. विजयी आघाडीमुळे पुढील दोन सामन्यांमध्ये फारसा दबाव नसल्याने भारत आपल्या संघरचनेत प्रयोग होण्याची शक्यता होती. भुवनेश्वर कुमारच्या जागी मयांक यादव आणि ईशान किशन परतल्याने वैभव सूर्यवंशीला संघातून बाहेर केले आहे. कुलदीप, वरुण या फिरकीपटूंना मागील काही महिन्यांत अपेक्षित संधी मिळालेल्या नाहीत. फलंदाजी अगदी आठव्या क्रमांकापर्यंत असावी, याबाबत संघव्यवस्थापन आग्रही असल्याने या दोघांना संधी मिळत नाहीये.

चौथा टी-२० सामना ईडन पार्क, ऑकलंड येथे होणार आहे. सोनी नेटवर्क आणि सोनी लिव्हवर हा सामना पाहता येणार आहे. खेळपट्टीचा अंदाज पाहिला तर इडन पार्क हे पहिल्या तीन सामन्यांच्या तुलनेत वेगळी परीक्षा घेणारे मैदान ठरू शकते, हे पारंपरिकदृष्ट्या अधिक नावा होणारे टी-२० मैदान मानले नाते. येथील असामान्य आयताकृती आकारमानामुळे काही भागांत सीमारेषा तुलनेने कमी अंतरावर आहेत. येथे झालेल्या गेल्या १३ -२० सामन्यांमध्ये पहिल्या डावाची सरासरी धावसंख्या १८३च्या आसपास राहिली आहे.

भुवनेश्वरची कामगिरी

गोलंदाजीत भुवनेश्वर कुमारने वोलंग्टनमधोल गेल्या सामन्यात शेवटच्या षटकांत चांगली कामगिरी केली. त्याचे सलग दोन यॉर्कर प्रभावी ठरले. पहिल्या तीन सामन्यांत मात्र भुवनेश्वरने ७२ चेंडूंत १३९ धावांची खैरात केली होती. तो बराच महागडा ठरला. चार वर्षांनंतर आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळणाऱ्या भुवनेश्वरला आपल्या कामगिरीत सुधारणा करावी लागेल. मागील दोन सामन्यांत मयंक यादवऐवजी प्रिन्स यादवला अंतिम अकरामध्ये संधी देण्यात आली. आता भुवीला बाहेर करत मयंकला संधी मिळाली आहे. तिसऱ्या टी-२० सामन्यात दोन अष्टपैलू फिरकीपटू अक्षर पटेल आणि नमन धीर अंतिम अकरामध्ये होते. मात्र, त्यांना गोलंदाजीची संधी मिळाली नाही. आतापर्यंत ११५ सामन्यांत ७.७०च्या इकॉनॉमीने गोलंदाजी करणाऱ्या अक्षरने या मालिकेत प्रतिषटक ९.५८च्या सरासरीने धावा दिल्या आहेत. त्याला फक्त दोन विकेट मिळाल्या आहेत. गेल्या सहा महिन्यांत वरुणचा सूर हरपलेला आहे. मात्र, कुलदीपने मधल्या षटकांमध्ये विकेट घेतल्या आहेत. कुलदीपला वेस्ट इंडिजविरुद्धच्या घरच्या मालिकेतील दोन सामन्यांत संधी मिळाली होती. न्यूझीलंडविरुद्ध मात्र पहिल्या तीन सामन्यांत कुलदीप बाकावरच राहिला. कुलदीपला आणखी बाहेर ठेवल्यास त्याच्या आत्मविश्वासावर परिणाम होऊ शकतो. न्यूझीलंडचा कर्णधार मिचेल सँटनरने आपल्या डावखुऱ्या फिरकी गोलंदाजीने प्रभावित केले. मात्र, त्याला इतर गोलंदाजांची पुरेशी साथ मिळाली नाही. भारताने वेलिंग्टनमध्ये पहिल्या सहा षटकांतच विक्रमी ११८ धावा केल्या होत्या. मॅट हेन्रीनंतर लॉकी फर्ग्यूसनही दुखापतीमुळे मालिकेतून बाहेर पडल्याने न्यूझीलंड संघाला आणखी एक धक्का बसला आहे.भारताची प्लेइंग 11 भारत (प्लेइंग 11): अभिषेक शर्मा, संजू सॅमसन (WK), इशान किशन, श्रेयस अय्यर (C), तिलक वर्मा, नितीश कुमार रेड्डी, नमन धीर, अक्षर पटेल, अर्शदीप सिंग, मयंक यादव, प्रिन्स यादव

न्युझीलंडविरूद्ध चौथ्या टी-20i मॅचमध्ये अर्शदीप सिंह 1 विकेट घेताच होणार जगातील नंबर वन बॉलर

मुंबई : वृत्तसंस्था

भारत आणि न्यूझीलंडमधील पाच सामन्यांच्या मालिकेतील चौथा सामना उद्या म्हणजेच शुक्रवारी पार पडणार आहे. भारतीय संघाने या मालिकेत ३-०ने विजयी आघाडी घेतली आहे. त्यामुळ यजमान किवी संघ व्हाईटवॉश टाळण्यासाठी आपली सर्व ताकद लावताना दिसेल. हा सामना भारताचा वेगवान गोलंदाज अर्शदीप सिंह याच्यासाठी खास असणार आहे. कारण ऑकलंड येथे एक विकेट घेताचा अर्शदीपच्या १५० विकेट्स घेत विक्रम रचणार आहे. भारताकडून टी-२० क्रिकेटमध्ये सर्वाधिक विकेट घेणारा तो पहिलाच गोलंदाज ठरणार आहे. पण त्यासोबत एक विशेष कामगिरीमुळे तो जगातील पहिला वेगवान गोलंदाजही ठरेल.

अर्शदीप सिंहने आतापर्यंत १०२ टी-२० सामन्यात ९८ डावात १४९ विकेट्स नावावर केल्या आहेत. २७ वर्षीय अर्शदीपने एक विकेट घेतली की १५० चा टप्पा पूर्ण होईलच पण पण वेगवान गोलंदाजांमध्ये सर्वात कमी डावांमध्ये १५० विकेट्स घेणार तो एकमेव गोलंदाज ठरेल. १०० पेक्षा कमी डावांमध्ये १५० विकेट्स घेणारा जगातील पहिला वेगवान गोलंदाज बनेल. याआधी दोन स्पिनर्सने ही कामगिरी केली असून यामध्ये श्रीलंकेचा वानिंदू हसरंगा आणि अफगाणिस्तानच्या राशीद खान असून दोघांनी अनुक्रमे ९० डावांत आणि ९२ डावांत १५० विकेट्स पूर्ण केल्या होत्या.

'कारट्या तुझ्यामुळे नातेवाईकांचे फोन यायला लागलेत!' गौतमी पाटीलशी लग्न केल्याच्या चर्चांवर वैतागलेली शिव ठाकरेची आई, सांगितली गंमत

बुमराहच्या १२६ विकेट्स आणि अर्शदीप सिंग १४९ विकेट्स असून दोघांमध्ये तब्बल २३ विकेट्सचा फरक आहे. बुमराह या शर्यतीत मागे असण्याचं मुख्य कारण म्हणजे दुखापत आणि वर्कलोड मॅनेजमेंटमुळे त्याला विश्रांती देण्यात येते. त्यासोबतच बुमराहला विरोधी संघातील खेळाडू बचावात्मक खेळ खेळून धावा वाचवण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळेही त्याला विकेट कमी आहेत.

टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये अफगाणिस्तानचा राशीद खान १९९ विकेट्ससह जगातील अव्वल गोलंदाज आहे, तर न्यूझीलंडचा टीम साउदी (१६४ विकेट्स) हा जगातील सर्वात यशस्वी वेगवान गोलंदाज आहे. एकूण सर्वाधिक विकेट्स घेणाऱ्यांच्या यादीत राशीद खाननंतर आदिल रशीद (१७१), एहसान खान (१६५), ईश सोढी (१६५), टिम साउदी (१६४), वानिंदु हसरंगा (१६३), मुस्तफिजुर रहमान (१६३) आणि ॲडम झम्पा (१५३) यांचा नंबर लागतो. भारताचा अर्शदीप सिंग, न्यूझीलंडचा मिचेल सँटनर आणि बांगलादेशचा शकीब अल हसन प्रत्येकी १४९ विकेट्ससह अगदी १५० विकेट्सच्या उंबरठ्यावर आहेत. जगातील टॉप ५ वेगवान गोलंदाजांचा विचार केला तर टिम साउदी (१६४) पहिल्या, मुस्तफिजुर रहमान (१६३) दुसऱ्या आणि भारताचा अर्शदीप सिंग (१४९) तिसऱ्या स्थानावर असून, बहरीनचा रिझवान बट (१४८) आणि आयर्लंडचा मार्क अडायर (१४२) अनुक्रमे चौथ्या आणि पाचव्या क्रमांकावर आहेत.

पॅरा ॲथलिट नीरज यादव प्रकरणात महिलेच्या एन्ट्रीमुळे मोठा ट्विस्ट

मुंबई : वृत्तसंस्था

भारताचे पॅरा ॲथलिट नीरज यादव यांनी टोकाचं पाऊल उचलत जीवन संपवले होते. नीरज यादव यांनी विष प्राशन करत स्वत:ला संपवलेले. पण या प्रकरणात आता मोठा ट्विस्ट आला आहे. ४२ वर्षीय नीरज यादव यांच्यासोबत मृत्यूआधी नेमकं काय घडलं होतं? ते कुठे होते? स्वत:ला संपवण्याचा निर्णय का घेतला? असे अनेक प्रश्न निर्माण झाले होते. पण या प्रकरणाच्या तपासादरम्यान एका महिला मित्राचा संबंध अँगल समोर आला आहे.

नेमकं काय आहे प्रकरण?

देशासाठी तीन सुवर्ण जिंकणाऱ्या चॅम्पियन ॲथलिट नीरज यादव यांचा २८ ऑक्टोबरला मृत्यूच्या बातमीने क्रीडा विश्वात खळबळ उडाली होती. नीरज यांनी इतका मोठा निर्णय घेतला असे अनेक प्रश्न निर्माण झाले होते. मात्र या प्रकरणात आता नीरज यांच्या मृत्यू प्रकरणात महिलेची एन्ट्री झालीय. कारण या महिलेनेचे त्यांना दवाखान्यात नेले होते. पण त्याआधी काय घडलं होतं संबंधित महिला आणि नीरज यादव यांची २०२५ पासून एकमेकांची मैत्री होती. ती महिला २७ ऑक्टोबर २०२६ रोजी ती नीरज यांना भेटण्यासाठी सोनीपत येथे गेली होती आणि तिने "यापुढे आपण संपर्कात राहणार नाही" असे सांगून नाते संपवण्याचा निर्णय घेतला होता. यानंतर नीरज यादव यांनी स्वतःच्या स्कॉर्पिओ कारने तिला दिल्लीतील मौजपुर येथे सोडले. रात्री ९ च्या सुमारास संशय आल्याने ती महिला पुन्हा मौजपुर मेट्रो स्टेशनच्या गेट नंबर १ जवळ आली, तेव्हा नीरज यादव हे त्यांच्या कारच्या बाजूलाच रस्त्यावर बेशुद्ध अवस्थेत पडलेले दिसले. त्या महिलेनेच नीरज यादव यांना तातडीने दिल्लीच्या GTB रुग्णालयात नेले, मात्र डॉक्टरांनी त्यांना दाखल करण्यापूर्वीच मृत घोषित केले. पोलिसांना २८ ऑक्टोबरच्या मध्यरात्री रुग्णालयातून या घटनेची माहिती मिळाली. गेल्या काही महिन्यांपासून नीरज यादव हे प्रचंड मानसिक तणावाखाली होते. डोपिंग चाचणीत दोषी आढळल्यामुळे त्यांच्यावर ४ वर्षांची बंदी घालण्यात आली होती आणि त्यांचे आशियाई पॅरा गेम्समधील सुवर्णपदकही हिरावून घेण्यात आले होते. मैत्रिणीने नाते तोडल्यामुळे त्यांनी विष प्राशन करून आत्महत्या केल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे. भारतीय पॅराॲथलेटिक्स संघाचे मुख्य प्रशिक्षक सत्यनारायण हे २०२३च्या हाँगझोउ आशियाई पॅरा स्पर्धेनंतर उत्तेजक प्रकरण समोर आल्यापासून यादव यांच्या संपर्कात होते. 'नीरजने आत्महत्या केली आहे.

पाकिस्तानच्याच दिग्गज क्रिकेटरने काढली त्यांचीच लायकी! रॅपिड-फायरमध्ये आफ्रिदी की बुमराह, विराट की बाबर, द्रविड आणि लक्ष्मणची यांचीही नावे

मुंबई : वृत्तसंस्था

भारत वि. पाकिस्तानचा सामन्यात आता पहिल्यासारखा दम राहिला नाही. आपले वाघ पाकड्यांची सहज शिकार करताना दिसतात. पूर्वीचा तो थरार आणि काँटे की टक्कर म्हणण्याजोगे आता सामने पाहायला मिळत नाहीत. आकडेवारी पाहिली तर गेल्या ४ वर्षात पाकिस्तानने भारताविरूद्ध एकही विजय मिळवू शकलेला नाही. भारताचा आताचे खेळाडू सरस आहेतच पण जुन्या खेळाडूंमध्ये भारत आणि पाकिस्तानमध्ये कोणते खेळाडू एकमेकांपेक्षा सरस होते हे विचारल्यावर पाकिस्तानच्या माजी क्रिकेटरने भारतीय खेळाडूंनाच पसंती दिली. वकार युनूसने 'शुभंकर मिश्रा पॉडकास्ट'मध्ये रॅपिड-फायरमध्ये भारताच्या खेळाडूंना अधिक पंसती दिली.

रॅपिड-फायर सेगमेंटमध्ये वकार युनूसला प्रेशरमध्ये सामना जिंकवून देण्याची क्षमता आणि कौशल्यावर बोलताना जावेद मियांदाद की भारताचा माजी कर्णधार एमएस धोनी? विचारले होते. यामध्ये त्याने माहीचे नाव घेतले. त्याचं कारण सांगताना धोनीने आपल्या संपूर्ण करिअरमध्ये स्वबळावर भारताला जास्त सामने जिंकवून दिले आहेत, जे त्याला एक उत्कृष्ट फिनिशर बनवते. फखर झमान विरुद्ध रोहित शर्मा यांच्यात रोहितला, मिस्बाह-उल-हक विरुद्ध व्हीव्हीएस लक्ष्मण यांच्यात लक्ष्मणला,

तर युनूस खान विरुद्ध राहुल द्रविड यांच्यात द्रविडला पसंती दिली. पण वीरेंद्र सेहवाग विरूद्ध डावखुऱ्या सईद अन्वरमध्ये त्याने सईद अन्वरचे नाव घेतले.

बॉलिंगमध्ये पाकिस्तानचा शाहीन आफ्रिदी आणि भारताच्या जसप्रीत बुमराह यांच्यात वकार युनूसने बुमराहची निवड केली. मोहम्मद अमीरपेक्षा भारताच्या मोहम्मद शमीला त्यांनी अधिक उत्तम गोलंदाज मानले. भारताचा १५ वर्षीय उगवता तारा वैभव सूर्यवंशी आणि पाकिस्तानचा २० वर्षीय समीर मिन्हास या नवोदित खेळाडूंपैकी एकाला निवडण्यास त्यांनी नकार दिला, कारण या दोघांना जास्त खेळताना पाहिलेलं नसल्याचं उत्तर वकार युनूसने दिले.

वकार युनूसने ८७ कसोटी सामन्यांत ३७३ विकेट्स घेतल्या आहेत. २६२ वनडे सामन्यांत ४१६ विकेट्स (सर्वोत्कृष्ट ७/३६) घेत एकूण ७८९ आंतरराष्ट्रीय विकेट्स घेतल्या आहेत. २२ वर्षे १५ दिवस वयाचे असताना पाकिस्तानचे सर्वात तरुण कर्णधार बनलेल्या वकार यांनी १७ कसोटी आणि ६२ वनडे सामन्यांत संघाचे नेतृत्व केले होते. कसोटी कारकिर्दीत २२ वेळा एका डावात ५ विकेट्स तर ५ वेळा सामन्यात १० विकेट्स घेण्याचा पराक्रम केला. प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये ९५६ विकेट्स घेतल्या असून ऐतिहासिक कामगिरीसाठी २०१३ मध्ये त्यांचा आयसीसी हॉल ऑफ फेममध्ये समावेश करण्यात आला होता.

तिलक बोलता बोलता महत्त्वाचं सांगून गेला! कोच गंभीरने आम्हाला T-20I मालिका सुरु होण्याआधीच सांगितलेलं

मुंबई : वृत्तसंस्था

भारत आणि न्यूझीलंडमधील चौथा सामना शुक्रवारी पार पडणार आहे. पाच सामन्यांच्या मालिकेत भारताकडे ३-०ने विजयी आहे. भारताने मालिका खिशात घातली असली तरीसुद्धा आपली ताकद कमी करणार नाही. याबाबत भारतीय संघाचा उपकर्णधार तिलक वर्मा याने माहिती दिली आहे. ऑकलंडमधील ईडन पार्कवर हा सामन होणार असून या सामन्याआधी माध्यमांशी तिलक वर्माने संवाद साधला. यावेळी बोलताना तिलकने कोच गौतम गंभीर यांनी संघाला दिलेल्या सल्लाबद्दलची माहिती दिली.

तिलक वर्मा काय म्हणाला?

"आमचे पूर्ण लक्ष आता न्यूझीलंडला ५-० ने हरवण्यावर आहे आणि आमच्याकडे ही मोठी संधी आहे. आमचे पहिले टार्गेट चौथा सामना जिंकणे हे आहे. जेणेकरून भारतीय चाहत्यांना ५-० अशा ऐतिहासिक विजयाचा आनंद घेता येईल. मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांनी सांगतलेलं की हा दौरा खूप लांब असून टी-२० मालिकेतील आमची लय पुढील वनडे आणि टेस्ट मालिकेसाठी टोन सेट करेल", असं तिलक वर्माने सांगितलं. न्यूझीलंडचा दौरा मोठा असून टी-२० मालिकासुद्धा पाच सामन्यांची होती, त्यामुळेच ही मालिका जिंकत एक दमदार सुरूवात मिळवल्यावर परदेशात खेळण्याचा दबाव जाणवणार नाही. दुसरं म्हणजे पराभूत झाल्यावर त्याचा परिणाम पुढील वनडे आणि कसोटी मालिकेवर होऊ शकतो. त्यामुळेच गंभीर यांनी खेळाडूंना हा मालिका जिंकत पुढच्या मालिकांसाठी एक टोन सेट करण्याबाबत सांगितले असावे. करिअरची सुरुवात टॉप ऑर्डर फलंदाज म्हणून करणाऱ्या तिलक वर्माने आता जागतिक क्रिकेटमध्ये एक उत्तम 'फिनिशर' म्हणून ओळख निर्माण केली आहे. आपल्या फलंदाजीबद्दल बोलताना तो म्हणाला, माझ्याकडे पॉवर-हिटिंगची क्षमता आधीपासूनच आहे, मी तिसऱ्या क्रमांकावरही धावा केल्या आहेत. आता ५ व्या किंवा ६ व्या क्रमांकावर फलंदाजी करताना, जर पहिल्याच चेंडूवर बाउंड्री मारण्याची संधी मिळाली तर मी नक्कीच मारतो. तसे नसेल, तर मी भागीदारी रचून खेळ पुढे नेण्यावर भर देत असल्याचं तिलक म्हणाला. दुसऱ्या टी-२० सामन्यात भारताने १८१ धावांचा पाठलाग करताना केवळ ७० धावांवर ५ विकेट्स गमावल्या होत्या. तिथून तिलक वर्माने संकटमोचकाची भूमिका बजावत ५१ धावांची नाबाद आणि मॅच-विनिंग खेळी खेळत टीम इंडियाला थरारक विजय मिळवून दिला होता. या सामन्यामध्ये भारताचा पराभव होतो की काय असे वाटत होते. पण तिलकने संयमी आणि तितकाच आक्रमक खेळ करत विजयश्री मिळवून दिला.

भारतीय संघ: वैभव सूर्यवंशी, अभिषेक शर्मा, संजू सॅमसन (wk), श्रेयस अय्यर (C), तिलक वर्मा, नितीश कुमार रेड्डी, नमन धीर, अक्षर पटेल, भुवनेश्वर कुमार, अर्शदीप सिंह, प्रिन्स यादव, ईशान किशन, कुलदीप यादव, शिवम दुबे, वरुण चक्रवर्ती, कुमार कुशाग्र, मयांक यादव, तिलक वर्माने कोच गौतम गंभीर यांच्या टी-२० मालिकेसाठी दिलेल्या सल्ल्याबद्दल आपले मत कमेंट बॉक्समध्ये शेअर करा. तुम्हाला वाटते का की हा सल्ला भारतीय संघासाठी फायदेशीर ठरेल?

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

आश्रम शाळेला आणखीन एक मानाचा तुरा

प्रा.डॉ. दिनेश सूर्यवंशी यांचा पीएच.डी. पदवी प्राप्त.

महागांव | प्रतिनिधी

छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रशासन व्यवस्थेतील शिलेदारांच्या कार्यावर ऐतिहासिक संशोधन; प्रियदर्शनी शिक्षण संस्थेच्या वतीने गौरव

आमणी बु. येथील वनमालाताई राठोड कला व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयातील इतिहास विषयाचे प्राध्यापक डॉ. दिनेश दत्तात्रय सूर्यवंशी यांनी इतिहास विषयात पीएच.डी. (विद्यावाचस्पती) ही पदवी प्राप्त केल्याबद्दल प्रियदर्शनी शिक्षण संस्थेच्या वतीने त्यांचा सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला. संस्थेच्या सचिव आदरणीय श्रीमती वनमालाताई राठोड यांच्या हस्ते हा सत्कार सोहळा पार पडला. त्यांच्या या उल्लेखनीय यशामुळे संस्थेच्या शैक्षणिक व संशोधनपरंपरेत मानाचा तुरा रोवला गेला असून, त्यांच्या यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

डॉ. दिनेश सूर्यवंशी यांनी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातून मानव्य विद्याशाखेअंतर्गत इतिहास विषयात 'छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रशासन व्यवस्थेतील शिलेदारांची कामगिरी : एक ऐतिहासिक अध्ययन' या विषयावर संशोधन पूर्ण केले. या संशोधनातून छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रशासन व्यवस्थेतील शिलेदारांचे योगदान, कार्य आणि ऐतिहासिक महत्त्व यांचा अभ्यासपूर्ण वेध घेण्यात आला आहे. त्यांच्या संशोधन कार्याची दखल घेत विद्यापीठाने त्यांना पीएच.डी. पदवी प्रदान केली.

या सत्कार समारंभास प्रियदर्शनी शिक्षण संस्थेच्या सचिव आदरणीय श्रीमती वनमालाताई राठोड, संस्थेचे कोशाध्यक्ष श्री. सुनील भाऊ राठोड, प्राचार्य श्री. जयकुमार वानखेडे, मुख्याध्यापक श्री. राजू कावडे यांच्यासह संस्थेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी संस्थेच्या सचिव श्रीमती वनमालाताई राठोड यांनी डॉ. सूर्यवंशी यांच्या संशोधन कार्याचे आणि शैक्षणिक योगदानाचे विशेष कौतुक केले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रशासन व्यवस्थेतील शिलेदारांच्या कार्याचा अभ्यास करून त्यांनी ऐतिहासिक संशोधन क्षेत्रात मोलाची भर घातली आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले. त्यांच्या संशोधनातून मिळालेले ज्ञान विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचून त्यांच्यामध्ये इतिहासाविषयी जिज्ञासा, चिकित्सक दृष्टिकोन आणि संशोधनाची आवड निर्माण व्हावी, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

■ **प्रियदर्शनी शिक्षण संस्थेतील तिसरे पीएच. डी.धारक शिक्षक**

प्रियदर्शनी शिक्षण संस्थेतील पीएच.डी. पदवी प्राप्त करणारे डॉ. दिनेश सूर्यवंशी हे तिसरे शिक्षक ठरले आहेत. यापूर्वी डॉ. नामदेव दिगंबर सूर्यवंशी यांनी राज्यशास्त्र विषयात, तर डॉ. पवनकुमार जोशी यांनी इंग्रजी विषयात पीएच.डी. पदवी प्राप्त केली आहे. आता इतिहास विषयात डॉ. दिनेश सूर्यवंशी यांनी संपादन केलेल्या या यशामुळे संस्थेच्या शैक्षणिक गुणवत्तेत आणि संशोधनपरंपरेत आणखी एक मानाचा अध्याय जोडला गेला आहे.

याप्रसंगी प्राचार्य श्री. जयकुमार वानखेडे यांनी डॉ. सूर्यवंशी यांचे यश संस्थेसाठी गौरवास्पद असल्याचे सांगितले. शिक्षकांनी ज्ञानार्जनासोबत संशोधनाची कास धरल्यास विद्यार्थ्यांनाही उच्च शैक्षणिक ध्येय गाठण्याची प्रेरणा मिळते. अशा यशामुळे संस्थेतील शैक्षणिक वातावरण अधिक समृद्ध होण्यास मदत होते, असे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. भास्कर शिंदे यांनी केले, तर श्री. लक्ष्मण पतंगे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

डॉ. दिनेश सूर्यवंशी यांच्या या उल्लेखनीय शैक्षणिक यशाबद्दल संस्थेतील सर्व शाळा, विद्यार्थी, सहकारी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले. त्यांच्या या यशामुळे संस्थेच्या शैक्षणिक क्षेत्रातील लौकिकात भर पडली असून, त्यांच्या पुढील शैक्षणिक व संशोधनपर वाटचालीस सर्वांकडून शुभेच्छा व्यक्त करण्यात येत आहेत.

शेतकऱ्यांना ५ हजार, मग भूमिहीनांच्या दिवाळीचे काय? सरपंच भरत आबा जाधव यांचा सवाल!

दुष्काळामुळे शेतमजुरांच्या हाताला काम नाही; भूमिहीन व वंचित कुटुंबांना आर्थिक मदत किंवा आनंदाचा शिधा वाटप करण्याची मागणी

देऊळगाव (आदिनाथ ठोंबरे)

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना पाच हजार रुपयांचे अनुदान देण्याची चर्चा सुरू असताना भूमिहीन शेतमजूर, रोजंदारी कामगार तसेच अनुसूचित जाती-जमातीतील गरजू कुटुंबांची दिवाळी कशी साजरी होणार, असा सवाल दौलावडगावचे विद्यमान सरपंच भरत आबा जाधव यांनी उपस्थित केला आहे.

दुष्काळामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला असताना शेतात काम उपलब्ध नसल्याने शेतमजूर आणि रोजंदारीवर उदरनिर्वाह करणाऱ्या कुटुंबांसमोरही मोठे संकट निर्माण झाले आहे. शेतकऱ्यालाच दुष्काळाचा सामना करावा लागत असेल, तर शेतमजुरांनी जायचे कुठे? असा प्रश्न उपस्थित होत आहे. शेतकऱ्यांसाठी आर्थिक मदतीची चर्चा होत असताना भूमिहीन, निराधार, रोजंदारी कामगार आणि अनुसूचित जाती-जमातीतील गरजू कुटुंबांसाठी सरकारने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत, याबाबत स्पष्टता आवश्यक आहे. दिवाळीपूर्वी या गरजू कुटुंबांना किमान पाच हजार रुपयांची आर्थिक मदत थेट त्यांच्या बँक खात्यात जमा करावी किंवा सरकारच्या माध्यमातून आनंदाचा शिधा वाटप करून या कुटुंबांची दिवाळी गोड करावी, अशी मागणी सरपंच भरत आबा जाधव यांनी प्रसिद्धीमाध्यमांद्वारे केली आहे. पात्र लाभार्थ्यांची यादी ग्रामपंचायत स्तरावर तयार करून कोणताही गरजू लाभार्थी मदतीपासून वंचित राहणार नाही, याची दक्षता घ्यावी, असेही त्यांनी म्हटले आहे. दिवाळी हा सण सर्वांचा असून शेतकऱ्यांप्रमाणेच भूमिहीन आणि वंचित कुटुंबांच्याही घरात आनंदाचा दिवा पेटला पाहिजे. त्यामुळे सरकारने केवळ घोषणांपुरते मर्यादित न राहता आर्थिक मदत किंवा आनंदाचा शिधा वाटपाबाबत तातडीने ठोस निर्णय घ्यावा, अशी मागणी सरपंच भरत आबा जाधव यांनी केली आहे.

बलात्कार व अॅट्रॉसिटीच्या गुन्ह्यातील तीन आरोपींची निर्दोष मुक्तता

बीड जिल्हा व सत्र न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निर्णय; सबळ पुराव्याअभावी आरोपींची निर्दोष सुटका

आष्टी | प्रतिनिधी

बलात्कार आणि अॅट्रॉसिटीसारख्या गंभीर गुन्ह्यांत दाखल असलेल्या प्रकरणात बीड येथील प्रमुख जिल्हा व सत्र न्यायालयाने तीन आरोपींची सबळ पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता केली आहे. या निकालामुळे संबंधित प्रकरणाची कायदेशीर प्रक्रिया पूर्ण झाली असून, आरोपींच्या वतीने अॅड. सचिन सयाजीराव जायभाये यांनी न्यायालयात प्रभावी बाजू मांडली.

या प्रकरणातील फिर्यादी महिलेने ५ जुलै २०२३ रोजी आष्टी तालुक्यातील अंभोरा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. तक्रारीनुसार, १३ मार्च २०२३ रोजी सायंकाळी आठ वाजण्याच्या सुमारास आरोपीच्या घरी उसने दिलेले तीन लाख रुपये मागण्यासाठी गेली असता आरोपींनी जातीवाचक शिवीगाळ करून मारहाण केली. तसेच आरोपी जानकीराम बापू गहाणे यांनी लाथाबुक्क्यांनी मारहाण करून धमकी दिल्याचा आणि यापूर्वीही आमिष दाखवून अत्याचार केल्याचा आरोप फिर्यादीने केला होता. या तक्रारीवरून पोलिसांनी बलात्कार आणि अॅट्रॉसिटी कायद्यानुसार गुन्हा दाखल केला होता.या प्रकरणाचा तपास पूर्ण झाल्यानंतर पोलिसांनी आरोपींविरुद्ध दोषारोपपत्र दाखल केले. बीड येथील प्रमुख जिल्हा व सत्र न्यायालयात विशेष खटला क्रमांक १३३/२०२३ नुसार या प्रकरणाची सुनावणी झाली. सुनावणीदरम्यान सरकार पक्षातर्फे एकूण सात साक्षीदार तपासण्यात आले.मात्र, आरोपींच्या बचाव पक्षाने मांडलेले युक्तिवाद आणि उपलब्ध पुराव्यांचा विचार करता सरकार पक्षाला आरोप सिद्ध करण्यात यश आले नाही. त्यामुळे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री. सुराणा साहेब यांनी २१ ऑक्टोबर २०२६ रोजी या प्रकरणातील जानकीराम बापू गव्हाणे (रा. वेलतुरी, ता. आष्टी, जि. बीड) यांच्यासह अन्य दोन आरोपींची निर्दोष मुक्तता करण्याचा निर्णय दिला.या खटल्यात आरोपींच्या वतीने अॅड. सचिन सयाजीराव जायभाये यांनी काम पाहिले. त्यांना अॅड. अभिजित एस. गव्हाणे आणि अॅड. एजाज शब्बीर मोमीन यांनी सहकार्य केले.

सुंबेवाडीत पाणीटंचाईचे भीषण संकट!

तीन वाड्या-वस्त्यांतील नागरिकांची पाण्यासाठी वणवण; प्रशासनाने तातडीने टँकर सुरू करावेत, समाजसेवक कुताळ यांची मागणी

देऊळगाव (आदिनाथ ठोंबरे)

आष्टी तालुक्यातील सुंबेवाडी ग्रामपंचायत हद्दीत पाणीटंचाईचा प्रश्न गंभीर बनत असताना प्रशासनाने आता तरी जागे व्हावे, अशी मागणी पुढे येत आहे. ग्रामपंचायत हद्दीत तीन वाड्या-वस्त्या असून, पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना पाण्यासाठी अडचणींचा सामना करावा लागत आहे. अशा परिस्थितीत प्रशासनाने तातडीने उपाययोजना करून टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करावा, अशी मागणी समाजसेवक कुताळ यांनी केली आहे.

पाणी ही नागरिकांची मूलभूत गरज असताना टंचाईच्या काळात पाणीपुरवठ्याचे योग्य नियोजन करणे ही प्रशासनाची महत्त्वाची जबाबदारी आहे. सुंबेवाडी ग्रामपंचायत हद्दीतील तिन्ही वाड्या-वस्त्यांमधील नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी त्रास सहन करावा लागत असेल, तर त्यांच्या समस्येकडे गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक आहे.

■ **प्रशासनाला सवाल : नागरिकांना पाण्यासाठी वणवण करावी लागल्यानंतरच उपाययोजना होणार का?**

पाणीटंचाईची परिस्थिती लक्षात घेऊन संबंधित विभागाने प्रत्यक्ष पाहणी करावी, पाण्याची उपलब्धता तपासावी आणि आवश्यकतेनुसार तिन्ही वाड्या-वस्त्यांसाठी टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करावा. केवळ आश्वासनांवर न थांबता नागरिकांना प्रत्यक्ष दिलासा मिळेल, अशा ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी समाजसेवक कुताळ यांनी केली आहे.

उन्हाळ्याची वाट पाहत बसण्याऐवजी पाणीटंचाईच्या समस्येवर वेळीच उपाययोजना करणे गरजेचे आहे. प्रशासनाने या मागणीकडे दुर्लक्ष न करता तातडीने निर्णय घ्यावा आणि सुंबेवाडीतील नागरिकांना पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

■ **आता प्रश्न एकच : सुंबेवाडीतील पाणीटंचाई दूर करण्यासाठी प्रशासन तातडीने टँकर सुरू करणार की नागरिकांना पाण्यासाठी आणखी प्रतीक्षा करावी लागणार?**

वाहिरा परिसरात बिबट्याचा वावर; शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण

वनविभागाच्या पथकाकडून घटनास्थळाची पाहणी; बिबट्याच्या पायाचे ठसे आढळले, पिंजरा लावण्याची शेतकऱ्यांची मागणी

प्रतिनिधी – सोपान पगारे

आष्टी : आष्टी तालुक्यातील वाहिरा परिसरात गेल्या दोन दिवसांपासून बिबट्याचा वावर असल्याचे निदर्शनास येत आहे. शेतात काम करत असताना काही शेतकऱ्यांना बिबट्याच्या पायाचे ठसे आढळून आले असून, काहींना बिबट्याचे प्रत्यक्ष दर्शन झाल्याचेही सांगण्यात येत आहे. त्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

बिबट्याच्या वावरामुळे शेतकरी सायंकाळनंतर शेतात जाण्यास धजावत नसून, जनावरांना चारा-पाणी करण्यासाठी जाणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये विशेष चिंता व्यक्त केली जात आहे. या पार्श्वभूमीवर वनविभागाने नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. शेतकऱ्यांनी एकट्याने शेतात जाऊ नये, सोबत काठी व टॉर्च ठेवावी तसेच लहान मुलांना शेतात पाठवू नये, अशा सूचना देण्यात आल्या आहेत.

वाहिरा गावचे विद्यमान सरपंच संभाजी गाडे यांनी या घटनेची माहिती वनविभागाला दिली. तसेच परिसरात बिबट्याचा वावर लक्षात घेता नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी तातडीने पिंजरा लावून बिबट्याचा बंदोबस्त करावा, अशी मागणी सरपंच संभाजी गाडे व स्थानिक शेतकऱ्यांच्या वतीने करण्यात आली आहे.

दरम्यान, वनविभागाला माहिती मिळताच वनपरिक्षेत्र अधिकारी अमोल मुंढे यांच्या मार्गदर्शनाखाली ए. एस. काळे, बी. ए. शिंदे, के. डी. पंडलवाड, शकील शेख, एल. बी. तागड यांच्यासह वनविभागाच्या पथकाने वाहिरा येथे घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. यावेळी बिबट्याच्या पायाचे ठसे आढळून आल्याचे सांगण्यात आले.

वनविभागाच्या पथकाने ग्रामस्थांना सतर्क राहण्याचा इशारा दिला असून, बिबट्याच्या वावरामुळे नागरिकांनी घाबरून न जाता खबरदारी घ्यावी, असे आवाहन केले आहे. मात्र, बिबट्याचा बंदोबस्त करण्यासाठी वनविभागाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी ग्रामस्थ व शेतकऱ्यांकडून जोर धरत आहे.

दैनिक
अतुल्य महाराष्ट्र
● बीड, शनिवार, 31 ऑक्टोबर 2026
Last page

दुष्काळी परिस्थितीत पशुधनाला दर्जेदार आणि सुरक्षित चारा मिळणार - ना. पंकजाताई मुंडे यांची माहिती

मंत्रिमंडळ उपसमितीच्या अभ्यासगटाच्या बैठकीत चाऱ्याचे दर निश्चित ; पशुपालकांना दिलासा

दुष्काळ जाहीर कालावधीत सुधारित आधारभूत दर लागू ; सुका चारा प्रतिकिलो कमाल १२ रुपये; मुरघासासाठी कमाल ८ रुपये

मुंबई | दुष्काळजन्य परिस्थितीतील संभाव्य चारा टंचाईवर मात करून पशुपालकांना दिलासा देण्यासाठी राज्य शासनाने चारा खरेदीचे दर निश्चित केले आहेत. राज्य शासनाने पशुधनासाठी खरेदी करण्यात येणाऱ्या सुक्या चाऱ्याची कमाल आधारभूत किंमत वाहतूक खर्च वगळून प्रतिकिलो १२ रुपये, तर मुरघासाची कमाल आधारभूत किंमत वाहतूक खर्च वगळून प्रतिकिलो ८ रुपये निश्चित केली आहे, अशी माहिती राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांनी दिली आहे.चारा टंचाईच्या काळात पशुधनासाठी चारा उपलब्ध करून देण्याच्या उपाययोजनांना यामुळे मदत होणार आहे.

राज्यातील खरीप हंगामातील परिस्थितीचा आढावा घेऊन आतापर्यंत एकूण ३०४ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर संभाव्य चारा टंचाईवर मात करण्यासाठी महसूलमंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील मंत्रिमंडळ उपसमितीने अभ्यासगटाची स्थापना केली होती. या अभ्यासगटात ना. पंकजाताई मुंडे सदस्य असून या गटाने राज्यासह इतर राज्यांमधील चारा व्यवस्थापनाच्या उपाययोजनांचा अभ्यास करून उपलब्ध चारा, संभाव्य उत्पादन आणि आगामी काळातील गरज लक्षात घेऊन अहवाल सादर केला. या अहवालाला २७ ऑक्टोबर रोजी झालेल्या मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

हे दर मदत व पुनर्वसन विभागाने जाहीर केलेल्या दुष्काळाच्या कालावधीसाठी लागू राहतील. जिल्हास्तरीय दुष्काळ व्यवस्थापन कार्यकारी समितीने अभ्यासगटाच्या अहवालातील तरतुदी आणि मदत व पुनर्वसन विभागाच्या निर्देशांनुसार चारा खरेदीची कार्यवाही करण्यात येणार आहे. तसेच वाहतुकीसाठी परिवहन आयुक्तांनी वेळोवेळी निश्चित केलेले दर लागू राहतील. चाऱ्याच्या गुणवत्तेबाबतही शासनाने निकष निश्चित केले आहेत. खरेदी करण्यात येणाऱ्या सुक्या चाऱ्यातील ओलावा कमाल १५ टक्के असावा. चारा चांगला दिसणारा तसेच आंबट किंवा कुबट वास, बुरशी, कीड आणि माती नसलेला असावा. ज्वारी आणि बाजरीच्या चाऱ्याला प्राधान्य देण्यात येणार आहे. मुरघास हवाबंद आणि बुरशीमुक्त असणे आवश्यक आहे. त्यामधील ओलावा ६२ ते ७० टक्के, पीएच ३.५ ते ४.४ आणि क्रूड प्रोटीन किमान ७ टक्के असावे. अन्य घटकांसाठी भारतीय मानक ब्युरोच्या आयएस १९५६२ : २०२६ मधील निकष लागू राहतील.

■ पशुधनाला दर्जेदार आणि सुरक्षित चारा मिळणार

राज्यातील दुष्काळी परिस्थितीत शेतकऱ्यांसमोर शेतीबरोबरच पशुधनाच्या चाऱ्याचा प्रश्नही निर्माण होतो. पशुधन हे शेतकऱ्यांच्या उपजीविकेचे महत्त्वाचे साधन असल्याने दुष्काळाच्या काळात त्यांना चारा उपलब्ध करून देणे ही शासनाची प्राथमिकता आहे. याच उद्देशाने सुका चारा व मुरघासासाठी आधारभूत दर निश्चित करण्याचा निर्णय घेतला आहे. केवळ चाऱ्याचे दर निश्चित करणे एवढाच या निर्णयाचा उद्देश नसून, पशुधनाला दर्जेदार आणि सुरक्षित चारा मिळावा, यासाठी गुणवत्तेचे निकषही ठरविण्यात आले आहेत. जिल्हास्तरावर योग्य नियोजन आणि काटेकोर अंमलबजावणी करून दुष्काळी परिस्थितीत शेतकऱ्यांना आणि पशुपालकांना दिलासा देण्याचा शासनाचा प्रयत्न आहे असं पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांनी म्हटलं आहे.

अंबाजोगाईत धक्कादायक प्रकार : स्वारातीत मोतीबिंदू शस्त्रक्रियेनंतर ४ रुग्णांची दृष्टी गेल्याचा आरोप

निष्काळजी डॉक्टरांची उच्चस्तरीय चौकशी करून कारवाई करा; तालुका काँग्रेस कमिटीची मागणी

अंबाजोगाई - शहरातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (स्वाराती) येथे मोतीबिंदू शस्त्रक्रिया झालेल्या चार रुग्णांच्या डोळ्यांना गंभीर इन्फेक्शन होऊन त्यांची दृष्टी गेल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या घटनेमुळे शासकीय रुग्णालयाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, नागरिकांमधून संताप व्यक्त होत आहे.

प्राप्त माहितीनुसार, मागील आठवड्यात स्वाराती रुग्णालयाच्या नेत्र विभागात काही रुग्णांवर मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात आल्या होत्या. शस्त्रक्रियेनंतर काही दिवसांतच संबंधित रुग्णांना डोळ्यांमध्ये वेदना, लालसरपणा आणि दिसण्यास त्रास होऊ लागला. तपासणीअंती त्यांच्या डोळ्यांमध्ये गंभीर संसर्ग (इन्फेक्शन) झाल्याचे निदर्शनास आले आणि त्यामुळे त्यांची दृष्टी जवळजवळ गेल्याचे सांगण्यात येत आहे.

सदर प्रकार उघडकीस येऊ नये म्हणून रुग्णालय प्रशासनाने या चारही रुग्णांना पुढील उपचारासाठी शासकीय वाहनाने जालना येथील एका खाजगी गणपती नेत्र रुग्णालयात पाठवल्याचा आरोप नातेवाईकांनी केला आहे. जालना येथे ८ दिवस उपचार घेऊन परत आल्यानंतरही त्यांना रुग्णालयात दाखल न करता "बुधवारी पुन्हा तपासणीसाठी या" असा सल्ला देण्यात आल्याचे सांगण्यात येते. या प्रकारामुळे प्रशासन प्रकरण दाबण्याचा प्रयत्न करत असल्याची चर्चा शहरात आहे.

या संपूर्ण प्रकरणाची गंभीर दखल अंबाजोगाई तालुका काँग्रेस कमिटीने घेतली आहे. तालुकाध्यक्ष अभिजीत लोमटे यांनी या घटनेचा तीव्र निषेध केला आहे.

"हा गंभीर प्रकार केवळ निष्काळजीपणा नसून गरीब रुग्णांच्या जीवाशी खेळ आहे. या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी झाली पाहिजे. दोषी विभाग प्रमुखासह संबंधित डॉक्टर व कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी आमची मागणी आहे. जोपर्यंत कारवाई होत नाही, तोपर्यंत काँग्रेस पक्ष स्वस्थ बसणार नाही," असे अभिजीत लोमटे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे म्हटले आहे.

या घटनेमुळे "शासकीय रुग्णालयात गरीब रुग्ण सुरक्षित आहेत का?" असा सवाल उपस्थित होत आहे.

तालुक्यातील सर्वात मोठी ग्रामपंचायत असलेल्या धामणगाव परिसरात पाणीटंचाई गंभीर

धामणगाव आणि वाडा वस्त्यांवरील पाणीपुरवठा सुरळीत करा युवा नेते अमोल भैया चौधरी यांची मागणी

आष्टी (प्रतिनिधी)

आष्टी तालुक्यातील मोठे बाजारपेठ असलेले व सर्वाधिक उत्पन्न असलेली ग्रामपंचायत धामणगाव आणि परिसरात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाल्याने पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. नागरिकांसह दुधाळ जनावरांनाही पाण्यासाठी संघर्ष करावा लागत असून, प्रशासनाकडून टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. मात्र, धामणगाव परिसरातील अनेक वाड्या-वस्त्यांवर टँकर वेळेवर पोहोचत नसल्याने नागरिकांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे गावासह परिसरातील सर्व वाड्या-वस्त्यांवर टँकरद्वारे नियमित आणि सुरळीत पाणीपुरवठा सुरू करावा, अशी मागणी युवा नेते अमोल भैया चौधरी यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी गटविकास अधिकाऱ्यांना निवेदन दिले असून, प्रशासनाने तातडीने उपाययोजना न केल्यास आंदोलन करण्याचा इशाराही दिला आहे.

धामणगाव आणि परिसरातील बहुतांश शेतकरी दुग्धव्यवसायावर अवलंबून आहेत. अनेक शेतकऱ्यांकडे मोठ्या प्रमाणात दुधाळ जनावरे असल्याने त्यांना दररोज पुरेशा पाण्याची आवश्यकता असते. मात्र, दुष्काळी परिस्थितीमुळे पाण्याचे स्रोत आटत चालले असून, नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी टँकरवर अवलंबून राहावे लागत आहे. अशा परिस्थितीत जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचाही प्रश्न गंभीर झाला आहे. नागरिक आणि

पशुधनाची तहान भागविण्यासाठी टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू असला, तरी काही वाड्या-वस्त्यांपर्यंत टँकर पोहोचत नसल्याच्या तक्रारी समोर येत आहेत.

युवा नेते अमोल भैया चौधरी यांनी गटविकास अधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात धामणगाव परिसरातील महाजनवाडी, डागाड वस्ती, सावकार वस्ती, खोसारी, हाडोळा, गाढवे व मुळे वस्ती वस्ती, वडाचा मळा, केदारे वस्ती, केवड्याचा मळा, लोखंडे वस्ती, पाथर्डी रोड परिसर, पोकळे वस्ती, कडा रोड आणि गुळगुळ बेट, ढोबळे वस्ती आणि भवर वस्ती या भागांतील पाणीपुरवठ्याचा प्रश्न मांडला आहे. या वाड्या-वस्त्यांवर टँकरद्वारे होणारा पाणीपुरवठा सुरळीत होत नसल्याने नागरिकांची गैरसोय होत असून, प्रशासनाने या समस्येकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले आहे.

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना पिण्यासाठी तसेच शेतकऱ्यांच्या दुधाळ जनावरांना आवश्यक असलेले पाणी वेळेवर उपलब्ध करून देणे ही प्रशासनाची महत्त्वाची जबाबदारी आहे. त्यामुळे संबंधित विभागाने प्रत्यक्ष परिस्थितीची पाहणी करून पाणीटंचाई असलेल्या सर्व वाड्या-वस्त्यांपर्यंत टँकर पोहोचतील, याची दक्षता घ्यावी. तसेच पाणीपुरवठ्याचे योग्य नियोजन करून कोणत्याही वस्तीवर पाण्याअभावी नागरिकांचे हाल होणार नाहीत, यासाठी तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी चौधरी यांनी केली आहे.

येत्या तीन ते चार दिवसांत धामणगाव आणि परिसरातील सर्व वाड्या-वस्त्यांवर टँकरद्वारे सुरळीत पाणीपुरवठा सुरू न झाल्यास आंदोलन छेडण्यात येईल, असा स्पष्ट इशारा अमोल भैया चौधरी यांनी दिला आहे. त्यामुळे आता संबंधित प्रशासन या पाणीटंचाईच्या प्रश्नावर कितपत गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने उपाययोजना करते, याकडे धामणगाव परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

वैद्यकीय शिक्षणासाठी पात्र ठरलेल्या मोहम्मद जैद असेफ शेख याचा सत्कार

यशवंतराव चव्हाण कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी : प्राचार्य प्रा. अतुल दुबे

परळी वैजनाथ | प्रतिनिधी

नाथ शिक्षण संस्था संचलित यशवंतराव चव्हाण कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी शिक्षण, क्रीडा आणि सांस्कृतिक क्षेत्रात सातत्याने उल्लेखनीय कामगिरी करत आहेत. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे महाविद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेत भर पडत असल्याचे प्रतिपादन महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. अतुल दुबे यांनी केले.

नाथ शिक्षण संस्थेचे अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री आ. धनंजय मुंडे, संस्थेच्या सचिव सौ. राजश्रीताई मुंडे आणि सहसचिव प्रदीप खाडे यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयातील विद्यार्थी विविध क्षेत्रांत यश संपादन करत असल्याचेही त्यांनी यावेळी नमूद केले.

नाथ शिक्षण संस्था संचलित यशवंतराव चव्हाण कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी मोहम्मद जैद असेफ शेख याने वैद्यकीय शिक्षणासाठी प्रवेश मिळविण्याचे उल्लेखनीय यश संपादन केले आहे. त्याची सिकंदराबाद येथील नीलिमा वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेशासाठी निवड झाली आहे. त्याच्या या यशाबद्दल महाविद्यालयाच्या वतीने मोहम्मद जैद असेफ शेख आणि त्याच्या पालकांचा सत्कार करण्यात आला.

महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. अतुल दुबे यांच्या हस्ते शाल, श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन हा सत्कार करण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी मोहम्मद जैद याच्या यशाचे कौतुक करत त्याला पुढील वैद्यकीय शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या.

या सत्कार समारंभास प्रा. ए. डी. शेख, प्रा. यू. एन. फड, व्ही. एन. शिंदे, एस. के. गित्ते, यू. बी. जगताप, ए. पी. जगतकर यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मोहम्मद जैद असेफ शेख याने मिळविलेल्या या यशाबद्दल महाविद्यालय परिवारातून त्याचे अभिनंदन करण्यात येत असून, त्याच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा व्यक्त केल्या जात आहेत.